सत्कार साहित्याचे एकमेव फेमस ठिकाण
SNB
S NAPKIN BOUQUET
S नॅपकिन बुके हाऊस कामोठे
आता आनंद मिळवा समारंभाच्या नंतरही
कॅटलॉग 8097549054 वेबसाईट

महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...
साप्ताहिक
RNI : MAH/MAR/2011/40762
पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in
E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १६ अंक : २०, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप मंगळवार, दिनांक ३० जून २०२६ ते ६ जुलै जून २०२६ पाने : ८ मूल्य : २ रुपये

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीतर्फे वारकऱ्यांसाठी 'चरण सेवा' उपक्रम; 12 हजार आरोग्यसेवकांची सेवा

मुंबई : आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे पायी निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे यंदाही 'चरण सेवा' उपक्रम राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाअंतर्गत पालखी मार्गावरील सुमारे ४०० मुक्कामस्थळी वारकऱ्यांना मोफत आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार, फिजिओथेरपी, पायांची आयुर्वेदिक तेलाने मालिश तसेच आरोग्य जनजागृतीची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. या उपक्रमात सातारा, पुणे, सोलापूर, नाशिक, बुलढाणा, अकोला, जालना, बीड, नांदेड, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या ११ जिल्ह्यांचा समावेश असून, १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट,



परिचारिका, वैद्यकीय विद्यार्थी आणि स्वयंसेवक सेवा देणार आहेत. वारकऱ्यांच्या सेवेसाठी ३ हजार लिटर आयुर्वेदिक तेलाची व्यवस्था करण्यात आली असून, गरजेनुसार रुग्णवाहिका सेवाही उपलब्ध राहणार आहे. याशिवाय आठ आरोग्य जनजागृती रथांच्या माध्यमातून स्वच्छता, संसर्गजन्य आजारांपासून बचाव, शासकीय आरोग्य योजना आणि निरोगी जीवनशैलीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. निवडक ठिकाणी योगसत्रांचेही आयोजन करण्यात आले आहे. 'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम वारकरी परंपरेतील सेवाभाव आणि आधुनिक वैद्यकीय सुविधांचा सुंदर संगम असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले. गतवर्षी या उपक्रमाचा लाभ सुमारे १.७५ लाख वारकऱ्यांनी घेतला होता.

## पाणी बचत व पर्यायी जलस्रोतांच्या वापरासाठी नवी मुंबई महापालिकेचे कडक नियोजन

**नवी मुंबई :** अल-निनोच्या प्रभावामुळे यंदा मान्सून सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज लक्षात घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेने पाणी बचतीसाठी आणि पर्यायी जलस्रोतांच्या प्रभावी वापरासाठी व्यापक नियोजन सुरू केले आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पाणीपुरवठा विभागाच्या उपाययोजनांचा आढावा घेत विविध महत्त्वाचे निर्देश दिले.

सध्या मोरबे धरणात केवळ ९.३६ टक्के (१७.८६३ द.ल.घ.मी.) पिण्यायोग्य पाणीसाठा शिल्लक असल्याने उपलब्ध जलसाठ्याचा काटेकोर वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. गृहनिर्माण संस्थांमध्ये पाणी बचतीबाबत जनजागृती, सूक्ष्म जलनियोजन, जलतरण तलाव, बागा व वाहन धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर बंद करण्याच्या सूचनांसह विहिरी व बोअरवेलचे पुनरुज्जीवन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

व्यावसायिक व वाणिज्यिक आस्थापनांकडून २० टक्के पाणीकपात होत असल्याची खातरजमा करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले. तसेच नागरिकांना अनधिकृत पाणीवापराची माहिती टोल-फ्री क्रमांक १८००२२२३०९ वर देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महापालिकेकडे उपलब्ध ५२.५० द.ल.लि. तृतीयस्तरीय प्रक्रियाकृत सांडपाण्याचा बांधकामे, उद्याने, सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांसाठी अधिकाधिक वापर करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे आदेश देत, पाणी बचतीत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. कैलास शिंदे यांनी केले.

## श्री संत रोहिदास दिंडी क्रमांक २४ चे मुंबईतून पंढरपूरकडे प्रस्थान



फोटो - ओमकार धुळप

मुंबई : "पाऊले चालती पंढरीची वाट..." या भक्तिभावपूर्ण वातावरणात वटपौर्णिमेच्या पवित्र शुभमुहूर्तावर श्री संत रोहिदास दिंडी क्रमांक २४ चे मुंबईतील गेटवे ऑफ इंडिया येथून पंढरपूरकडे उत्साहात प्रस्थान झाले. दिंडी प्रमुख ह.भ.प. नारायण महाराज पाटील, दिंडी चालक वारकरी भूषण चंद्रकांत कारंडे महाराज, शरद प्रतिभाषाली सांस्कृतिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजारामबुवा शेलार यांच्यासह हजारो वारकरी भाविक या सोहळ्याला उपस्थित होते.

मुंबईतून पंढरपूरकडे प्रस्थान करणारी ही पहिली दिंडी असल्याने दरवर्षी मुंबई व परिसरातील मोठ्या संख्येने वारकरी या सोहळ्यात सहभागी होतात. मुंबईहून सुरू झालेला हा पदयात्रेचा प्रवास सलग ११ दिवसांत आळंदी येथे पोहोचतो. त्यानंतर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यासोबत श्री संत रोहिदास दिंडी क्रमांक २४ पुढील १८ दिवसांचा प्रवास करून पंढरपूर गाठते. अशा प्रकारे तब्बल २९ दिवसांची ही अखंड पदयात्रा भक्तिभाव, नामस्मरण आणि वारकरी परंपरेचा अनोखा संगम ठरते. या दिंडीत दरवर्षी हजारो वारकरी सहभागी होतात.

श्री संत रोहिदास दिंडी क्रमांक २४ ची स्थापना १९७८ मध्ये संस्थापक वैकुंठवासी ह.भ.प. पांडुरंग कारंडे कराडकर महाराज यांनी केली. त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबीयांनी आणि वारकरी सेवकांनी ही परंपरा अखंडपणे जपली आहे.

यंदा दिंडीचे ४९ वे वर्ष असून, पुढील वर्षी होणारा सुवर्णमहोत्सवी सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्याचा मानस असल्याची माहिती डॉ. शांताराम कारंडे यांनी यावेळी दिली.

## उपवर्गीकरणावर राज्यात राजकीय संघर्ष तीव्र

### राजकुमार बडोले यांच्या नेतृत्वाखाली २७ आमदारांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन, आज मुंबईत भव्य मोर्चा

मुंबई : अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलेच तापले आहे. माजी सामाजिक न्यायमंत्री तथा विद्यमान आमदार राजकुमार बडोले यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील २७ आमदारांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन उपवर्गीकरणाची अंमलबजावणी तातडीने करण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अनुसूचित जातींतील सर्व घटकांना लोकसंख्या आणि सामाजिक मागासलेपणाच्या आधारे न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी आवश्यक प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली. दुसरीकडे, या निर्णयाच्या विरोधात आज (३० जून) मुंबईत मागासवर्गीय विविध संघटनांच्या वतीने मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान असा भव्य मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरातून मोठ्या संख्येने समाजबांधव आणि कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचा दावा आयोजकांनी केला असून, मोर्चाच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. एका बाजूला उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी आमदारांचा वाढता पाठिंबा, तर दुसऱ्या बाजूला त्याविरोधात उभे राहिलेले व्यापक जनआंदोलन यामुळे राज्य सरकारसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. सरकारची पुढील भूमिका काय असेल आणि या प्रश्नावर कोणता निर्णय घेतला जाईल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## मुंबईतील 99 हजारांहून अधिक नोंदणीकृत फेरीवाल्यांना क्यूआर कोड आधारित ओळखपत्रांचे वितरण सुरु

**मुंबई : महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित असलेल्या 'सक्षमा' या महिला व्यासपीठाचा भव्य अनावरण सोहळा दादर येथील छत्रपती शिवाजी मंदिर नाट्यमंदिरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात ऐरोलीच्या मैत्री ग्रुपच्या आकर्षक गणेशवंदनेने झाली. त्यानंतर मृणालिनी वानखेडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केलेल्या पारंपरिक 'बुरगुंडा' नृत्याविष्काराला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.**



'सक्षमा'च्या माध्यमातून महिलांना स्वावलंबनाची प्रेरणा देत विविध क्षेत्रांत सक्षम बनविणे हा प्रमुख उद्देश असल्याचे संस्थापक डॉ. कौतिक दांडगे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनुजा कौतिक दांडगे यांनी सांगितले. या वेळी प्रसिद्ध शेफ सरिता पदन यांची विशेष उपस्थिती लाभली.

'मर्दिनी' चित्रपटातील अभिनेते श्रेयस तळपदे, दीप्ती तळपदे, प्रार्थना बेहेरे, अभिजित खांडकेकर, जितेंद्र जोशी तसेच दिग्दर्शक अविनाश मयेकर यांच्या हस्ते 'सक्षमा'च्या अधिकृत ओळखपत्राचे अनावरण करण्यात आले. अभिनेत्री एकता सखदे हिची 'सक्षमा'ची अधिकृत ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषणा करण्यात आली. मोनिका टेमगिरे यांनी महिलांशी संवाद साधला.

स्वरिता आर्ट निर्मित व स्वरसाक्षी प्रतिष्ठान प्रस्तुत 'सुपर स्टार ऑर्केस्ट्रा' कार्यक्रमात गायक प्रीतम वावडेकर, नम्रता बेसवीकर, अक्षता सावंत आणि गायक दादूस यांनी बहारदार सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष लिंबोरे पाटील आणि स्वप्नील जाधव यांनी केले.

## संपादकीय

# नागरिकत्व सिद्ध कसे करायचे?

भारताचा नागरिक कोण आणि त्याचा पुरावा काय, हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी अलीकडेच पासपोर्ट हा प्रवासासाठी आवश्यक असलेला दस्तऐवज असून तो नागरिकत्वाचा अंतिम पुरावा मानला जाऊ नये, असे स्पष्ट केल्यानंतर या विषयावर राजकीय आणि सामाजिक वर्तुळात नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

स्वातंत्र्यानंतर अनेक पिढ्या "भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत," ही प्रतिज्ञा म्हणत मोठ्या झाल्या. स्वतःच्या नागरिकत्वाबाबत शंका घेण्याची वेळ त्यांच्यावर कधीच आली नव्हती. मात्र आज परिस्थिती बदलत आहे. विविध सरकारी योजनांसाठी, पडताळण्यांसाठी आणि प्रशासकीय प्रक्रियांसाठी नागरिकांना वारंवार वेगवेगळ्या कागदपत्रांची मागणी केली जात आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होणे स्वाभाविक आहे.

आज नागरिकांकडे आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, वाहन चालवण्याचा परवाना, पासपोर्ट, आभा कार्ड, ज्येष्ठ नागरिक ओळखपत्र, अपार कार्ड अशी अनेक ओळखपत्रे आहेत. ही सर्व कागदपत्रे शासनानेच दिलेली असतानाही त्यापैकी कोणतेही नागरिकत्वाचा अंतिम पुरावा नाही, असे सांगितले जाते. त्यामुळे सामान्य माणसाच्या मनात प्रश्न निर्माण होतो की, मग भारताचे नागरिकत्व नेमके सिद्ध कशाच्या आधारे करायचे?

विशेष म्हणजे पासपोर्ट मिळविण्याची प्रक्रिया अत्यंत कठोर असते. अर्जदाराची पोलीस पडताळणी, पत्ता, जन्मतपशील आणि इतर आवश्यक कागदपत्रांची सखोल छाननी झाल्यानंतरच पासपोर्ट दिला जातो. अशा परिस्थितीत पासपोर्टलाही नागरिकत्वाचा पुरावा मानले जात नसल्याचे स्पष्टीकरण अनेकांना गोंधळात टाकणारे आहे. कायदेशीरदृष्ट्या नागरिकत्व आणि ओळखपत्र यामध्ये फरक असला, तरी तो स्पष्टपणे लोकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी सरकारची आहे.

देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने बेकायदेशीर घुसखोरी रोखणे आणि नागरिकांची अचूक नोंद ठेवणे आवश्यक आहे. मात्र त्याचवेळी कायदेशीर भारतीय नागरिकांना वारंवार आपल्या अस्तित्वाचा पुरावा द्यावा लागणार नाही, याचीही काळजी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. प्रशासनाने नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी स्पष्ट, पारदर्शक आणि एकसमान धोरण जाहीर करणे ही काळाची गरज आहे.

लोकशाहीत नागरिक हा केंद्रबिंदू असतो. त्यामुळे शासनाने नागरिकांच्या मनातील संभ्रम दूर करून विश्वासाचे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. अन्यथा "नागरिकत्व सिद्ध कसे करायचे?" हा प्रश्न केवळ कायदेशीर न राहता सामाजिक आणि मानसिक अस्वस्थतेचाही विषय ठरेल.

# कर्जमुक्ती प्रक्रियेला वेग : पात्र शेतकऱ्यांचा तपशील संकलनाची जबाबदारी बँकांवर निश्चित

राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना" जाहीर केली असून या योजनेचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.

राज्यातील शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार विभागाने कंबर कसली आहे. या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी सर्व व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सहकार विभागाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

योजनेचा लाभ थेट आणि पारदर्शक पद्धतीने पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी बँकांकडून शेतकऱ्यांचा सविस्तर तपशील मागवण्यात येत आहे. बँकांना युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून बँकांना मुख्यालय आणि जिल्हा स्तरावर विशेष नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांनुसार पात्र शेतकऱ्यांची माहिती अचूक स्वरूपात संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्यासह प्रत्येक टप्प्यावर समन्वयाची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात आली आहे.

यासाठी प्रत्येक बँकेने मुख्यालय स्तरावर दोन नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापैकी एक अधिकारी योजना अंमलबजावणी समन्वयक, तर दुसरा माहिती तंत्रज्ञान समन्वयक म्हणून काम पाहणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय समिती (DLC) यांच्याशी समन्वय राखण्यासाठी स्वतंत्र जिल्हा नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

कर्जखात्यांचे दोन स्वतंत्र गट करण्यात आले आहेत. आधार क्रमांक उपलब्ध असलेली कर्जखाती आणि आधार क्रमांक उपलब्ध नसलेली कर्जखाती. ज्या खात्यांमध्ये आधार क्रमांक उपलब्ध नाही, अशा खात्यांची स्वतंत्र यादी तयार करून ती बँक शाखा, विकास संस्था तसेच गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मोहीम राबवून शेतकऱ्यांचा आधार क्रमांक प्रमाणीकरण करण्याचे आवाहन केले जात आहे. यासाठी बँकांनी विशेष आधार-जोडणी मोहीम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

आधार क्रमांक उपलब्ध असलेल्या कर्जखात्यांची माहिती शासनाने दिलेल्या नमुन्यानुसार तयार करून पोर्टल तातडीने अपलोड करावी लागणार आहे. दि३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली वैयक्तिक व संयुक्त पीककर्ज खाती यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत.

संयुक्त कर्जखात्यांसाठी सर्व कर्जदारांचे आधार क्रमांक, आधार-जोडलेली बचत खाती तसेच प्रत्येकाचा कर्जातील हिस्सा नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मयत कर्जदारांच्या प्रकरणांमध्ये वारसांची नोंद करून त्यानुसार लाभ वितरित करण्यात येणार आहे.

कर्जखात्यांची माहिती अपलोड करताना पोर्टलवरील निकषांचे पालन करणे आवश्यक राहील. त्रुटी आढळल्यास माहिती दुरुस्त करून पुन्हा अपलोड करावी लागणार आहे. आधार क्रमांक असलेल्या खात्यांची माहिती प्रथम अपलोड केली जाईल, तर नंतर आधार जोडणी झालेल्या खात्यांची माहिती पुढील टप्प्यांत स्वीकारली जाणार आहे.

माहितीची संगणकीय पडताळणी झाल्यानंतर गावनिहाय लाभार्थी यादी पोर्टलवर उपलब्ध होईल. ही यादी बँक शाखा व विकास संस्थांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा संबंधित बँक शाखेत उपस्थित राहण्याबाबत संदेश पाठविण्यात येईल.

शेतकऱ्यांना यादीतील माहितीबाबत हरकत असल्यास ती थेट जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे पाठविली जाईल. समितीच्या निर्णयानुसार संबंधित बँकांनी आवश्यक दुरुस्त्या करून माहिती अद्ययावत करणे बंधनकारक राहील.

आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर व्यापारी बँकांच्या लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम थेट जमा केली जाईल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ४८ तासांच्या आत संबंधित नोंदी अद्ययावत करून पोर्टलवर माहिती नोंदविणे आवश्यक राहील. कर्जमाफीची रक्कम जमा झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे पात्र शेतकऱ्यांची अचूक ओळख, माहितीची पारदर्शक पडताळणी, तक्रार निवारणाची प्रभावी व्यवस्था आणि कर्जमाफीचा लाभ वेळेत पोहोचविणे शक्य होणार आहे या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाची माफी करण्यात येणार आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित कर्जांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा किंचित अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी विशेष तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासन दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र करण्यात आले आहे.

एकवेळ समजोता योजना (वन टाईम सेटलमेंट) प्रकरणांबाबतही शासनाने दिलासादायक निर्णय घेतला असून व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

ॲग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही प्रथम नोंदणी करून त्यानंतर लाभ दिला जाणार आहे . आवश्यकतेनुसार विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांचा डेटा विशेष पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांना यादीत स्वतंत्र युनिक क्रमांक देण्यात येणार असून ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच ऑनलाइन पोर्टलवर यादी प्रसिद्ध करण्यात येणार . आधार प्रमाणीकरण आणि मोबाईल क्रमांक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकरी बांधवांच्या कर्जखात्यात रक्कम जमा केली जाणार आहे .लवकरच थकबाकीदार शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न असून त्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यास मदत होईल, या योजनेचा उद्देश केवळ कर्जमुक्ती देणे नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आहे.

**-काशीबाई थोरात –धायगुडे (वरिष्ठ सहायक संचालक), महाराष्ट्र शासन**

# मुंबई मराठी पत्रकार संघाच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचा सलग दुसऱ्यांदा विजय




मुंबई : मुंबई मराठी पत्रकार संघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीत संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन पॅनलने सलग दुसऱ्यांदा दणदणीत विजय मिळवला. विष्णू सोनावणे यांच्या नेतृत्वाखालील निर्भीड पॅनलला पराभव स्वीकारावा लागला.

आझाद मैदान येथील पत्रकार संघाच्या कार्यालयात शनिवारी खेळीमेळीच्या वातावरणात मतदान पार पडले. मतदानानंतर तात्काळ झालेल्या मतमोजणीत परिवर्तन पॅनलने बहुमत मिळवत सर्व प्रमुख पदांवर वर्चस्व राखले. अध्यक्षपदी संदीप चव्हाण, कार्यवाहपदी शैलेंद्र शिर्के, विश्वस्तपदी प्रकाश कुलकर्णी आणि कोषाध्यक्षपदी जगदीश भोवड यांची निवड झाली.

कार्यकारिणी सदस्यपदासाठी झालेल्या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे सर्व नऊ उमेदवार विजयी झाले. उपाध्यक्षपदी राजेंद्र हुंजे आणि स्वाती घोसाळकर यांची निवड झाली. कार्यकारिणी सदस्य म्हणून गजानन सावंत (दैनिक सामना) यांनी विक्रमी मतांनी विजय मिळवला. त्यांच्यासह दिवाकर शेजवळकर, विनोद साळवी, आत्माराम नाटेकर, रजनीश राणे, अंशुमन पोयरेकर, सारंग दर्शने, राजेश खाडे आणि किरीट गोरे हेही विजयी झाले.

# सीईटी पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करा; शिक्षक भारतीची मागणी

मुंबई : नीट पेपरफुटीनंतर राज्यात आता सीईटी पेपरफुटीचा प्रकार समोर आल्याने शिक्षण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेचे कार्याध्यक्ष सुभाष सावित्री किसन मोरे यांनी केली आहे.

मोरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, टीईटी परीक्षेतील गैरव्यवहार, बनावट गुणपत्रिका, बोगस शालार्थ आयडी, तसेच शिक्षण विभागातील विविध भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असून त्याचा फटका विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना बसत आहे.

ते म्हणाले की, गेल्या सहा महिन्यांपासून शिक्षक बीएलओ (BLO), एसआयआर (SIR) आणि जनगणनेची कामे पार पाडत आहेत. शाळा सुरू झाल्यानंतर नियमित अध्यापनासोबत टीईटी परीक्षेची तयारीही त्यांना करावी लागत आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर टीईटी परीक्षा सक्तीची झाल्याने शिक्षकांवर अतिरिक्त मानसिक ताण निर्माण झाला आहे.

शिक्षण मंत्र्यांनी या संपूर्ण प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालून सीईटी पेपरफुटी प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच निवडणूक आयोग आणि जिल्हाधिकारी कार्यालयाशी समन्वय साधून शिक्षकांना बीएलओ व एसआयआर ड्युटीतून मुक्त करावे, अशी मागणी त्यांनी केली.

अन्यथा, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांच्या सहभागातून 'शाळा बंद' आंदोलन छेडावे लागेल, असा इशाराही शिक्षक भारती संघटनेचे कार्याध्यक्ष सुभाष सावित्री किसन मोरे यांनी दिला.

# 'नमस्ते' योजनेतून कचरा वेचक महिलांचा सन्मान; शहर सुंदर ठेवणाऱ्या हातांचा गौरव – महापौर सुजाता पाटील

नवी मुंबई(भीमराव धुळप) : भारत सरकारच्या 'नमस्ते' (नॅशनल ॲक्शन फॉर मॅकनाईज्ड सॅनिटेशन इकोसिस्टिम) योजनेअंतर्गत नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे अनौपचारिक कचरा वेचक महिलांना पीपीई किट, आयुष्मान भारत कार्ड आणि नमस्ते ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी महापौर सुजाता पाटील यांनी शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवणाऱ्या कचरा वेचक महिलांच्या कार्याचा गौरव केला.

महापौर म्हणाल्या, देशातील 'सुपर स्वच्छ लीग'मध्ये नवी मुंबईला मिळालेल्या मानांकनामागे स्वच्छताकर्मी आणि कचरा वेचक महिलांचे मोठे योगदान आहे. संघर्षातून उभ्या राहत घर, संसार आणि शहर स्वच्छतेची जबाबदारी सांभाळणाऱ्या तसेच दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या महिलांनी समाजासमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.



घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांनी नमस्ते योजनेअंतर्गत आतापर्यंत 930 कचरा वेचक महिलांची नोंदणी करण्यात आली असून पहिल्या टप्प्यात 448 पीपीई किटचे वितरण करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच ई-रिक्षा कचरा संकलन वाहन चालविणाऱ्या महिलांचाही सन्मान करण्यात आला.

स्त्री मुक्ती संघटनेच्या प्रा. वृषाली मगदूम यांनी कचरा वेचक महिलांच्या सक्षमीकरणासाठी नवी मुंबई महापालिकेच्या सहकार्याचे कौतुक केले. कार्यक्रमात 'आता थांबायचं नाय' चित्रपटापासून प्रेरणा घेऊन दहावी उत्तीर्ण झालेल्या 11 कचरा वेचक महिलांचाही महापौरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला.

## ...थोडक्यात बातमी

### उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी आज मुंबईत भव्य मोर्चा

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी आज मेट्रो सिनेमा ते आझाद मैदान दरम्यान विविध सामाजिक संघटनांच्या वतीने भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या .संख्येने नागरिक सहभागी होण्याची अपेक्षा आहे

### आषाढी वारीसाठी एसटीची विशेष सेवा सुरू...

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने .राज्यभरातून विशेष बससेवा सुरू केली आहे

### मुंबईत पावसाचा जोर कायम

मुंबई व उपनगरात अधूनमधून मुसळधार पाऊस सुरू असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे प्रशासनाने .आवाहन केले आहे

### अनधिकृत स्टिकर्स व काळ्या फिल्मवरील कारवाई तीव्र

वाहनांवर अनधिकृत 'महाराष्ट्र शासन', 'पोलीस', 'आमदार' स्टिकर्स तसेच काळ्या फिल्मचा वापर करणाऱ्यांविरोधात .राज्यभरात विशेष कारवाई सुरू करण्यात आली आहे

### शेतकरी कर्जमुक्ती योजनेची अंमलबजावणी वेगात

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजने'अंतर्गत पात्र शेतकऱ्यांचा तपशील संकलित करण्याचे .काम बँकांनी युद्धपातळीवर सुरू केले आहे

### शाळांमध्ये प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात...

राज्यातील सरकारी व खासगी शाळांमधील प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून विद्यार्थ्यांच्या कागदपत्र पडताळणीचे .काम वेगाने सुरू आहे



आरओसी-२०२६-२७/क्र-५/D१३०७

# इतिहासाला रंगमंचावर जिवंत करणारा 'द किरण माने शो – स्टोरी शिवराज्याभिषेकांची'

नवी मुंबई(ओमकार भीमराव धुळप) : छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा इतिहास अनेकदा ऐकला आणि वाचला जातो; मात्र तो पुराव्यांसह, अभ्यासपूर्ण आणि तितक्याच प्रभावी नाट्यमय शैलीत अनुभवायचा असेल, तर 'द किरण माने शो – स्टोरी शिवराज्याभिषेकांची' हा प्रयोग अवश्य पाहावा असा आहे.

इतिहासकार व प्रसिद्ध लेखक इंद्रजीत सावंत यांच्या अभ्यासपूर्ण लेखणीतून साकारलेला हा अडीच तासांचा प्रयोग राज्याभिषेकापूर्वी आलेले राजकीय, सामाजिक आणि धार्मिक अडथळे अत्यंत प्रभावीपणे उलगडतो. इतिहास सांगताना कुठेही कृत्रिमता जाणवत नाही; उलट प्रत्येक प्रसंग प्रेक्षकांना खिळवून ठेवतो.

किरण माने यांचे एकपात्री सादरीकरण हा या प्रयोगाचा आत्मा आहे. विविध व्यक्तिरेखा, त्यांचे आवाज, संवादफेक आणि भावविश्व ते इतक्या सहजतेने उभे करतात की, रंगमंचावर अनेक कलाकार असल्याचा भास होतो. संत तुकारामांच्या अभंगांची सुरेल जोड




आणि कथानकाला अनुरूप नव्याने साकारलेली गीते प्रयोगाची उंची अधिक वाढवतात.

पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भानंतर मुंबईतील शिवाजी मंदिर आणि नवी मुंबईतील विष्णुदास भावे नाट्यगृहातही या प्रयोगाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नवी मुंबईतील प्रयोगाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आणि अभिनेत्री अश्विनी महांगडे यांची उपस्थिती लाभली. खचाखच भरलेल्या सभागृहातील टाळ्यांचा कडकडाट या प्रयोगाच्या यशाची साक्ष देणारा होता.

दर्जेदार सादरीकरणासाठी या प्रयोगाला 'झी गौरव' पुरस्काराने गौरविण्यात आले असून, प्रेक्षकांकडून आता या शोच्या दुसऱ्या भागाचीही जोरदार मागणी होत आहे. इतिहासाला मनोरंजनाची जोड देत खरा इतिहास जनतेसमोर पोहोचवणारा हा प्रयोग मराठी रंगभूमीवरील एक उल्लेखनीय कलाकृती ठरतो.

## नसरापूर चिमुरडी हत्या प्रकरण : न्यायालयाकडून आरोपी दोषी, पुराव्यांवर शिक्कामोर्तब

पुणे : नसरापूर येथील साडेतीन वर्षीय चिमुरडीच्या अपहरण, लैंगिक अत्याचार आणि हत्येप्रकरणी न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळे याला दोषी ठरवले आहे. २५ जून रोजी न्यायालयाने साक्षीदारांचे जबाब, न्यायवैद्यकीय अहवाल, डीएनए चाचणी आणि इतर भक्कम पुराव्यांची तपासणी करून आरोपीविरोधातील आरोप सिद्ध झाल्याचे नमूद केले.

या प्रकरणातील घटना १ मे २०२६ रोजी घडली. आजीच्या घराबाहेर खेळत असलेल्या चिमुरडीला फूस लावून गोठ्यात नेण्यात आले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार करून हत्या करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गावकऱ्यांनी आरोपीची ओळख पटवून त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले.

घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली. नवले पुलाजवळ महामार्ग रोखण्यात आला, तर तपासासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन करण्यात आले. राज्य सरकारने जलद तपास आणि जलदगती न्यायालयात खटला चालवण्याचे आश्वासन दिले. अवघ्या १५ दिवसांत न्यायवैद्यकीय आणि डीएनए पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी १,२०० पानी आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते.

## संस्कृती उत्सव नवी मुंबई : गणेशोत्सवातील कार्यकर्त्यांच्या सन्मानासाठी अनोखा उपक्रम

नवी मुंबई : गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि सामाजिक एकोप्याचा अविभाज्य भाग आहे. या उत्सवाच्या यशामागे रात्रंदिवस मेहनत घेणाऱ्या गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने "संस्कृती उत्सव नवी मुंबई" या सामाजिक उपक्रमांतर्गत "सन्मान गणरायाच्या भक्तांचा २०२६" या विशेष अभियानाची घोषणा करण्यात आली आहे.

या उपक्रमामध्ये नवी मुंबईसह परिसरातील गणेश मंडळांचे




कार्यकर्ते, ढोल-ताशा पथके, लेझीम पथके, स्वयंसेवक आणि गणेशभक्त यांच्या कार्याचा सन्मान केला जाणार आहे. समाजासाठी निस्वार्थपणे योगदान देणाऱ्या या कार्यकर्त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या कार्याची दखल घेणे आणि त्यांना प्रेरणा देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

मागील वर्षी ऐरोली ते पनवेल या संपूर्ण परिसरातील विविध गणेश मंडळांना तब्बल २१ पारितोषिके प्रदान करण्यात आली होती. या उपक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे यंदा त्यापेक्षाही अधिक पारितोषिकांची घोषणा लवकरच करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

संस्कृती उत्सव नवी मुंबईकडून आगामी काळात विविध स्पर्धा, मुलाखती, प्रेरणादायी संवाद, सामाजिक उपक्रम आणि विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, या माध्यमातून गणेशोत्सवातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन दिले जाणार आहे.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी तसेच आगामी घोषणांसाठी नागरिकांनी Instagram वर @ sanskritiutsav.nm या पेजला फॉलो करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## चित्रपटाच्या शीर्षकावर विठाबाईंच्या कुटुंबीयांचा आक्षेप

**मुंबई :** लोकशाहीर विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित आगामी चित्रपटाच्या शीर्षकावर त्यांच्या कुटुंबीयांनी आक्षेप नोंदवला आहे. विठाबाई यांचे पुत्र कैलास नारायणगावकर यांनी सांगितले की, चित्रपटाची माहिती त्यांना अवघ्या आठवडाभरापूर्वीच मिळाली. टीझर पाहिल्यानंतर आईचा संघर्ष मोठ्या पडद्यावर येत असल्याचा आनंद झाला, मात्र चित्रपट निर्मितीपूर्वी कुटुंबीयांशी संपर्क साधला असता तर त्यांच्या आयुष्यातील अनेक महत्त्वाचे पैलू आणि वास्तव घटनांची माहिती देता आली असती, असे त्यांनी नमूद केले.

ग्रामीण भागात 'विठा'चा उच्चार 'ईठा' असा होत असला तरी चित्रपटाचे शीर्षक 'विठा' किंवा 'विठाबाई' असेच असावे, अशी कुटुंबीयांची भूमिका आहे. तसेच, 'नारायणगावकर' हे आडनाव उपशीर्षकात समाविष्ट करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. विठाबाई यांचे नातू मोहित नारायणगावकर यांनी यासंदर्भात निर्मात्यांना ई-मेलद्वारे सूचना पाठवल्या असून, चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वी तो कुटुंबीयांना दाखवावा, जेणेकरून आक्षेपार्ह बाबींवर चर्चा करता येईल, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०१८.

Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in | ☎ ४१३६४०४/२४९३१९०१ फॅक्स
जा.क्र.का.अ./मर्मुवि/ई-निविदा/ २६०८ | दिनांक :- 25 JUN 2026

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता १० लक्ष च्या आतील कामांची **निविदा सुचना क्र.०७(सात)(सन २०२६-२७)** नुसार एकुण-१६ कामांचा निविदा विक्री कालावधी दि.३०/०६/२०२६, दुपारी १५.०० पासून ते दि.०७/०७/२०२६ रोजी १५.०० पर्यंत असून "बी-१" नमुन्यातील निविदा मागवित आहेत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,

आरओसी-२०२५-२६/क्र-५/C१३७६

## कायद्याचे पालन प्रत्येकानेच करावे; पत्रकारांचा अवमान सहन केला जाणार नाही – अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर

सातारा(विजय जाधव) : कायद्यापुढे सर्व समान असून प्रत्येकाने कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे. पत्रकार हे सामाजिक बांधिलकीतून कार्य करत असल्याने त्यांचा अवमान होऊ नये. पोलीस आणि पत्रकार हे समाजातील महत्त्वाचे दुवे असून पत्रकारांनीही सामाजिक भान ठेवून जबाबदारीने वृत्तांकन करावे, असे प्रतिपादन अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडूकर यांनी केले.



खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांशी कथितरीत्या अर्वाच्य भाषेत वाद घालून धमकावल्याच्या घटनेचा निषेध करत सातारा तालुका पत्रकार संघाने त्यांच्यावर कारवाईची मागणी करणारे निवेदन डॉ. कडूकर यांना दिले. तसेच पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. या प्रसंगी पत्रकार संघाचे अध्यक्ष अजय कदम, उपाध्यक्ष विजय जाधव, कार्याध्यक्ष बाळू मोरे, सुनील साबळे, राजेंद्र साबळे, संतोष यादव, निलेश रसाळ यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

यावेळी डॉ. कडूकर यांनी अनधिकृतपणे "आमदार", "पोलीस" किंवा "महाराष्ट्र शासन" असे स्टिकर्स लावलेल्या वाहनांवर कठोर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले. तसेच वाहनांवरील बेकायदेशीर डार्क फिल्म, बदललेले सायलेंसर आणि अन्य नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कोणताही मुलाहिजा न ठेवता कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at Plaskot Industries, 23, Municipal Indl. Estate, K. K. Marg, Satrasta, Mumbai -400 011 and published at C/66, Mukuda Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai - 400 017. Editor : Bhimrao Hindurao Dhulap, Mob. 9221117684
Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only.

हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीयल इस्टेट, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई -४०० ०११ येथून छापून सी/६६ मुकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई - ४०० ०१७ येथून प्रकाशित केले. संपादक : भिमराव हिंदुराव धुळप. मो. ९२२१११७६८४
(प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)